# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २६/११/२०२३ (रविवार)

---

## जबरी संभोग करणारा आरोपी अटकेत

**पोलीस स्टेशन मौदा**:— अंतर्गतनागपुर ते भंडारा रोड बालाजी लॉजींग ऑड बोर्डिग गुमथाळा शिवार ता कामठी जि नागपुर कामठी पश्चिम १३ किमी, यातील फिर्यादी पिडीता वय ३५ वर्ष व आरोपी यांची फेसबुकदवारे सन २०१६ ला ओळख झाली असुन, सदर आरोपी याने पिडीतेला दिनांक १/११/२०१६ पासुन दिनांक २७/८/२०२३ पर्यंत फिर्यादी पिडीतेस लग्नाचे आमिश दाखवुन वारंवार फिर्यादी सोबत शारीरीक संभोग केला. व सदरील व्हिडीओ काढुन ते वायरल करील अशी धमकी दिली. व आता लग्न करण्यास नकार दिला.

सदर प्रकरणी फिर्यादी/ पिडीता यांचे रिपोर्टवरुन आरोपी नामे— अक्षय टारझन मेश्राम वय ३४ वर्ष रा प्लॉट नंबर २०, शिवसुंदर नगर उमरेड रोड दिघोरी शमशान घाट जवळ नागपुर, यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर आरोपी विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३७६ (२) (एन), ५०४, ५०६ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास अधिकारी मसपोनि भुते पोस्टे मौदा मो न ९८२२५६६१८० हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन उमरेड**:—अंतर्गत मौजा तिरखुरा उमरेड ५ किमी पुर्व. फिर्यादीचा मोठा मुलगा वय १६ वर्ष रा. तिरखुरा हा सायन्स संस्कार शाळा उमरेड माध्यमात शिक्षण घेत आहे. फिर्यादीचे पती हे त्यास अभ्यासासाठी रागावले असता फिर्यादीचा मुलगा रागाचे भरात दि. २४/११/२३ रोजी चे सकाळी ०८/०० वा. नेहमीप्रमाणे शाळेत उमरेड येथे निघुन गेला. व सकाळी १०/०० वा. दरम्यान मो. क्र. ९६७३०३०३९६ या क्रमांकावरून फोन करून सांगितले की मी शाळेत गेलो नाही. मी नागपुरला काम करायला जातो, असे म्हणुन फोन कट केला. नंतर फोन केला असता फोन लागला नाही. नातेवाईकांकडे व मित्रांकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही. त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३६३ भा.द.वि.अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो उपनि किशोर मुळे पोस्टे उमरेड मो.क्र. ८८३०७६९९०५ हे करीत आहे.

## विवाहीत महीलेचा छळ करण्या—या विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन कन्हान** :— अंतर्गत जे एन हॉस्पीटल कांद्री कन्हान पारशिवनी, दिनांक २०/११/१७ ते २४/११/२३ चे १२/०० ते १५/०० वा दरम्यान, यातील फिर्यादी पिडीता हिचे माहेरच्या लोकांनी लग्नात १५ लाख रू., १० तोळे सोने, एक मोटार सायकल, आणि बाकी आंधन देउन सुदधा पुन्हा प्रॉपटीं मधील हिस्स्याचे पैसे माहेरून आण. असे म्हणुन फिर्यादी हिला तिच्या सासरच्या लोकांनी शिवीगाळ करून हातभुक्कीने मारपिट केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—सौ पुनम शिवकुमार प्रजापती वय २७ वर्ष रा जे एन हॉस्पीटल कांद्री कन्हान पारषिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी नामे—१.शिवकुमार रामकिशन प्रजापती २. रामकिशन प्रजापती ३.मुन्नी रामकिशन प्रजापती ४.सुनिल रामकिशन प्रजापती ५.सौ शिवकन्या हरीराम प्रजापती ६. हरीराम प्रजापती ७. शिवबरन प्रजापती ८. बबलु प्रजापती तिन्ही रा. जे एन हॉस्पीटल कांद्री कन्हान पारशिवनीयांचेविरूध्द कलम ४९८ ए, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मेश्राम/ मो न ९८२३४५३१६९ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन सावनेर** :— अंतर्गत तहसिल कार्यालय सावनेर १ कि मी दक्षिण, दिनांक २५/११/२३ चे ०८/०० वा दरम्यान, मृतक हा फिर्यादीचा मोठा भाउ असून तहसिल कार्यालय सावनेर येथे अर्जनविस चे काम करित होता. मृतक हा दारु पिण्याचा सवईचा असल्याने त्याची पत्नी मुलाबाळासह माहेरी राहत होती. व मृतक हा तहसिल कार्यालयात एकटाच राहत होता. अचानक मृतकाची प्रकृती बिघडल्याने दि २४/११/२३ रोजी दि २५/११/२३ चे सकाळी ०७/०० वा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—गौरव अनिल चवारे वय ३६ वर्ष रा रेल्वे स्टेशनचे मागे सावनेर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे सावनेर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास सफौ राठोड मो क्र ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**